# जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी कार्यालय, पालघर

पार्श्वनाथ-९, बिडको नाका, जि. पालघर - ४०१४०४.
फोन : ०२५२५-२५३१११ ईमेल: collectorpalghar@gmail.com

## शुध्दिपत्र

### पालघर जिल्ह्याच्या प्रारुप किनारा क्षेत्र व्यवस्थापन आराखडयांवरील (CZMPs) जनसुनावणी

**बाबतची सुचना संदर्भ :**

**१) जनसुनावणीबाबत स्थानिक वृत्तपत्र दैनिक लोकसत्ता यात मराठीत व राष्ट्रीय वृत्तपत्र दैनिक इंडियन एक्सप्रेस यात इंग्रजीत दिनांक ३०/०८/२०२० रोजी प्रकाशित करण्यात आलेली सुचना**

**२) पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांची कार्यालयीन निवेदन (F.No.22-25/2020-IA.III Dated 14/09/2020)**

संचालक, पर्यावरण तथा सदस्य सचिव, महाराष्ट्र सागरी किनारा व्यवस्थापन प्राधिकरण यांचेकडील दिनांक २५/०८/२०२० रोजीच्या पत्रानुसार डिजीटल प्लॅटफॉर्मद्वारे (Digital Platform) जनसुनावणी घेण्याबाबत निर्देश दिले होते.

त्यानुसार पालघर जिल्ह्याचे प्रारुप सागरी किनारा क्षेत्र व्यवस्थापन आराखडयावरील जनतेच्या सूचना/हरकती नोंदविण्यासाठी दिनांक ३०/०९/२०२० रोजी सकाळी ११.०० वा. डिजीटल प्लॅटफॉर्मद्वारे (Digital Platform) जनसुनावणीचे आयोजन करण्यात आले आहे. याबाबतची सुचना स्थानिक दैनिक लोकसत्ता या वृत्तपत्रात मराठीत व राष्ट्रीय दैनिक इंडियन एक्सप्रेस या वृत्तपत्रात इंग्रजीत दिनांक ३०/०८/२०२० रोजी प्रसिध्द करण्यात आली होती.

तदनंतर पर्यावरण, वने व वातावरणीय बदल मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांच्याकडील दिनांक १४/०९/२०२० रोजीच्या Office Memorandum मध्ये दिलेल्या निर्देशानुसार कोव्हीड-१९ च्या पार्श्वभूमीवर जनसुनावणीच्या वेळी सभागृहामध्ये १०० व्यक्तींच्या मर्यादेपर्यंत उपस्थितीस अनुमती दिलेली असुन, उपस्थित व्यक्तींना थर्मल स्क्रिनिंग, मास्क, सामाजिक अंतर राखणे, सॅनिटायझरचा वापर करणे अनिवार्य आहे.

ग्रामस्थ/नागरिक त्यांच्या लेखी सुचना/हरकती खालील ई-मेलवर पाठवू शकतात.

**१) collectorpalghar@gmail.com २) rothane@mpcb.gov.in**
**३) srotarapur2@mpcb.gov.in**

दिनांक ३०/०९/२०२० रोजी सकाळी ११.०० वाजल्यापासून डिजीटल प्लॅटफॉर्मद्वारे (Digital Platform) घेण्यात येणाऱ्या जनसुनावणीस ज्या ग्रामस्थ नागरिकांना ऑनलाईन पध्दतीने सहभाग घ्यावयाचा आहे त्यांनी CISCO WEBEX या ॲपचा वापर करावा. सदरील ॲपवरुन जनसुनावणीमध्ये सहभाग घेणेकरीता लिंक खालील प्रमाणे

**https://mh-dit.webex.com/mh-dit/j.php?MTID=m29432deee5a99c0895c3f5c0d4bbe18b**
**CISCO WEBEX MEETING ID :- 1704117943**
**Password :- Palg@1234**

पालघर जिल्हा प्रारुप सागरी किनारा क्षेत्र व्यवस्थापन आराखडयांवरील (CZMPs) जनसुनावणी **तिवारी रंगमंच, सोनोपंत दांडेकर महाविद्यालय, पालघर** येथे खालील वेळापत्रकानुसार घेण्यात येणार आहे.

| अ. क्र. | दिनांक | वेळ | जनसुनावणी पध्दत | गावे |
|---|---|---|---|---|
| १ | ३०/०९/२०२० | स. ११:०० वा. पासून | डिजीटल प्लॅटफॉर्मद्वारे (Digital Platform) ऑनलाईन | पालघर जिल्ह्यातील सर्व सागर तटीय गावे |
| २ | ३०/०९/२०२० | स. ११:०० वा. पासून | प्रत्यक्ष लोकसहभाग (ऑफलाईन) | |

तरी सर्व ग्रामस्थ/नागरिकांना विनंती आहे की, त्यांनी सदर जनसुनावणी करीता डिजीटल प्लॅटफॉर्मद्वारे (Digital Platform) अथवा प्रत्यक्ष ठिकाणी लेखी सुचना/हरकतीसह उपस्थित राहावे..

**सही/-**
**(डॉ. माणिक गुरसळ)**
**जिल्हादंडाधिकारी पालघर**

**दिनांक : २८.०९.२०२०**